


दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २४८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२० एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सावधान !

## २० ते २२ एप्रिल दरम्यान राज्यात वादळी पावसाची शक्यता



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, मुंबई :** पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

**कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी :**

- शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत
- काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा ताडपत्री/झाकणाने सुरक्षित ठेवावीत
- वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी
- शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये.

## रितेशच्या राजा शिवाजी सिनेमाला अजय देवगणच्या तान्हाजीचा मुजरा

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१९, मुंबई :** रितेश देशमुख लिखित आणि दिग्दर्शित 'राजा शिवाजी' चित्रपटाची सध्या एकच चर्चा आहे. या चित्रपटासाठी बहुआयामी आणि दिग्गज कलाकारांची फळी एकत्र येत आहे. हा भव्य ऐतिहासिक चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी आणि हिंदी भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचा टीझर समोर येताच सोशल मिडीयावर तसेच मनोरंजन विश्वातून अनेकांच्या मनात या चित्रपटाविषयी कुतूहल निर्माण झालंय. अनेक कलाकार या चित्रपटाला शुभेच्छा देताना दिसतायत. दरम्यान, 'तान्हाजी: द अनसंग' या चित्रपटातून मराठ्यांची शौर्यगाथा समोर आणणाऱ्या बॉलीवूड अभिनेता अजय देवगण यानेही 'राजा शिवाजी' चित्रपटाची झलक पाहून 'तान्ह्याचा मुजरा राजे' म्हणत रितेश आणि त्याच्या टीमला शुभेच्छा दिल्यात. भारतीय इतिहासाचा गौरव, त्यातील भावगर्भता आणि भव्यता यांचा संगम असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एका प्रेरणादायी प्रवासावर घेऊन जाणार आहे.

अजय देवगणचा 'राजा शिवाजी'ला मानाचा मुजरा

अजय देवगण याने सोशल मिडीयावर राजा शिवाजी चित्रपटाचं फोटो शेअर करत या चित्रपटाच्या भव्यतेचे कौतुक केले आहे. त्याने लिहिले, तान्ह्याचं नमन राजे, हे खूप अद्भूत दिसतंय तुम्हाला फक्त यश आणि कीर्तीच लाभो, अशी शुभेच्छा! असं म्हणत अजय देवगणने राजा शिवाजी चित्रपटाच्या टीमला आणि रितेश देशमुखला चित्रपटासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

मुजरा राजं या अजयच्या कमेंटची सोशल मिडीयावर चांगलीच चर्चा रंगलीय. तान्हाजीकडून शिवरायांना मनाचा मुजरा केल्याचं म्हणत प्रेक्षक या कमेंटवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत. शिवाय



यापूर्वी छावा चित्रपटात छत्रपती संभाजीराजेंची भूमिका साकारणारा अभिनेता विकी कौशलनेही या चित्रपटाला ' आबासाहेब' असं म्हणत आपला सपोर्ट केलं होता.

दरम्यान रितेश विलासराव देशमुख लिखित व दिग्दर्शित 'राजा शिवाजी' या चित्रपटात दिग्गज आणि बहुआयामी कलाकारांची फळी एकत्र आली आहे. यामध्ये संजय दत्त, अभिषेक बच्चन, विद्या बालन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, बोमन इराणी, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते, जिनिलिया देशमुख आणि रितेश विलासराव देशमुख यांचा समावेश आहे.

'जिओ स्टुडिओज' प्रस्तुत आणि 'मुंबई फिल्म कंपनी' निर्मित, ज्योती देशपांडे व जिनिलिया देशमुख निर्मित 'राजा शिवाजी' हा भव्य ऐतिहासिक चित्रपट १ मे २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये मराठी आणि हिंदी भाषांमध्ये प्रदर्शित होणार आहे. भारतीय इतिहासाचा गौरव, त्यातील भावगर्भता आणि भव्यता यांचा संगम असलेला हा चित्रपट प्रेक्षकांना एका प्रेरणादायी प्रवासावर घेऊन जाणार आहे.

## झोपडपट्टीतील तरुणाने साकारले भारतरत्न डॉ.बाबासाहेबांचे तैलचित्र

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१८, नागपूर :** सावनेर तालुक्याच्या चनकापूर येथील जय भोले नगर झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या कालेश्वर महेश भावे या होतकरू कलाकाराने आपल्या इच्छाशक्तीच्या जोरावर डॉ. आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अत्यंत सुंदर तैलचित्र साकारून रोहना गावकऱ्यांची मने जिंकली आहेत.

कालेश्वर भावे यांचे शिक्षण शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे झाले. घरची परिस्थिती बेताचीच होती, मात्र त्यांना कलेची आवड असल्याने त्यानी नागपूर येथील शरद पवार चित्रकला महाविद्यालयात प्रवेश मिळवून आर्ट टीचर डिप्लोमाचामिळविला व सोनू आर्ट्स नावाचे युनिट सुरू केले.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या कालेश्वर भावे यांनी त्यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून रोहना गावातील बौद्ध विहाराच्या भिंतीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य तैलचित्र साकारले. कालेश्वर भावे यांच्या कलेची दखल घेत रोहना ग्राम पंचायतचे सरपंच चंद्रशेखर लांडे यांच्या हस्ते त्याचा नुकताच गौरव करण्यात आला.

यावेळी सरपंच लांडे म्हणाले की, एका झोपडपट्टी परिसरात राहणाऱ्या तरुणाने आपल्या कलेच्या माध्यमातून स्वतः ची वेगळी ओळख निर्माण करणे ही समाजासाठी व इतर तरुणांसाठी प्रेरणादायी बाब आहे.याप्रसंगी रोहना गावातील बौद्ध विहाराचे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वर येत कालेश्वरने जो कलेचा वारसा जपला आहे, त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# 'अक्षराज'च्या बातमीचा इम्पॅक्ट !

## महापौरांच्या आश्वासनानंतर शिळ-ठाकूरपाडा येथे नालेसफाईला सुरुवात

● नगरसेविका वेदिका पाटील यांच्या मागणीला यश ● बाबाजी पाटील, अर्चना पाटील यांचा पाठपुरावा



दैनिक संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

मुख्य संपादक : विनोद गोरे मोबा.८६०५३१३२०२

### नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांची पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाईची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, पडले (ठाणे) :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२९ मधील भोलेनाथ नगर, ग्रीन पार्क, शिळफाटा, ठाकूरपाडा, कल्याण फाटा, पडलेगाव, खिडकाळी, देसाई, दोस्ती, खार्डीगाव, फडकेपाडा, साबेगाव, साळवी नगर परिसरातील नाले व गटारांची नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली.

पाहणी केल्यानंतर असे दिसून आले की, अनेक नाले व गटार प्लास्टिकच्या बॉटल व पिशव्यानी भरलेले आहेत. ज्यामुळे पावसाळ्यातील पाण्यामुळे गटाराचे पाणी नागरिकांच्या घरात शिरण्याची शक्यता आहे. तसेच भारत गियर ते शिळफाटा दरवर्षी पावसाचे पाणी साचून वाहतूक बंद होते. ज्याचा त्रास नोकरदार वर्ग व विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो. त्यामुळे भाजपा नगरसेविका वेदिका पाटील यांनी ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.बोडके यांची भेट घेऊन मोठे गटार व नाले आधुनिक पद्धतीने व ज्या ठिकाणी यंत्र सामुग्रही पोहचत नसेल त्या ठिकाणी डीपक्लिनिंग करून तत्काळ साफसफाई करून गाळ काढण्याची मागणी केली.

Main Edition - 18 Mar 2026 - Page 3
Powered By Aksharaj Media





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. १८, शिळफाटा (ठाणे) :** पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाच ठाणे महापालिका प्रभाग क्र. २९ मधील नालेसफाईचा प्रश्न मार्गी लागला आहे. भाजपा नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी उचललेल्या पावसाळापूर्व नालेसफाईच्या मुद्द्याला यश आले असून, ठाणे महापालिकेने आजपासून शिळ-ठाकूरपाडा येथील नैसर्गिक नाल्याच्या साफसफाईला सुरुवात केली आहे.

**'अक्षराज'मध्ये बातमी, प्रशासनाला घ्यावी लागली दखल...**

नैसर्गिक नाल्यांची साफसफाई करावी, अशी मागणी नगरसेविका वेदिका पाटील यांनी केली होती. १८ मार्च २०२६ रोजी दैनिक 'अक्षराज' वृत्तपत्रात ही बातमी प्रसिद्ध झाली व महाराष्ट्रभर वाऱ्यासारखी पसरली. या बातमीची दखल प्रशासनाला घ्यावीच लागली.

**महापौरांच्या बैठकीत दिले होते दोन दिवसांचे आश्वासन :**

यापूर्वी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका वेदिका पाटील व नगरसेविका अर्चना पाटील यांनी ठाणे महापौर आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत नालेसफाईचा मुद्दा मांडला होता. त्या बैठकीत दोन दिवसांत नालेसफाई सुरू करण्याचे आश्वासन महापौरांनी दिले होते. त्यानुसार आजपासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

**पाहणीत तुंबलेले नाले, नागरिकांना धोका :**

नगरसेविका वेदिका पाटील यांनी अधिकाऱ्यांसमवेत भोलेनाथ नगर, ग्रीन पार्क, शिळफाटा, ठाकूरपाडा, कल्याण फाटा, पडलेगाव, खिडकाळी, देसाई, दोस्ती, खार्डीगाव, फडकेपाडा, साबेगाव, साळवी नगर परिसरातील नाले-गटारांची पाहणी केली होती. अनेक नाले प्लास्टिकच्या बाटल्या व पिशव्यांनी तुंबल्याचे दिसले. पावसाळ्यात गटाराचे पाणी घरात शिरण्याचा धोका आहे. भारत गियर ते शिळफाटा पट्ट्यात दरवर्षी पाणी साचून वाहतूक ठप्प होते, असे पाटील यांनी सांगितले.

**उपायुक्तांकडे 'डीप क्लिनिंग'ची मागणी :**

पाहणीनंतर नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी उपायुक्त श्री. बोडके यांची भेट घेऊन मोठे नाले आधुनिक यंत्रणेद्वारे, तर अरुंद ठिकाणी मनुष्यबळाद्वारे डीप क्लिनिंग करून तातडीने गाळ काढण्याची मागणी केली होती.

**नगरसेविका वेदिका पाटील यांची प्रतिक्रिया :**

नागरिकांचे हाल होऊ नयेत म्हणून वेळेत पाठपुरावा केला. 'अक्षराज'ने बातमी लावल्याने आणि महापालिकेने तत्काळ दखल घेतल्याने यश मिळाले. संपूर्ण प्रभाग पावसाळ्यापूर्वी सुरक्षित करू, असे वेदिका पाटील म्हणाल्या.

**नगरसेवक बाबाजी पाटील म्हणाले :**

आम्ही सर्व नगरसेवकांनी एकत्रित पाठपुरावा केला. महापौरांनी दिलेला शब्द पाळला याचा आनंद आहे. प्रभागातील इतरही ठिकाणी टप्प्याटप्प्याने नालेसफाई केली जाणार आहे. पाण्याचा निचरा सुरळीत व्हावा यासाठी ही मोहीम महत्त्वाची आहे.

**शुभारंभ प्रसंगी मान्यवर उपस्थित :**

नालेसफाईच्या कामाच्या शुभारंभ प्रसंगी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील, भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ते बाळाराम पाटील, दिवा प्रभाग समितीचे अधिकारी चंद्रकांत वायतोंडे, कैलास पाटील, प्रेमनाथ भोईर, अतुल गुप्ता, सावन ठाकूर, अरिफ कुमार व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम राबविल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, प्रशासनाच्या या तत्परतेचे स्वागत होत आहे.

अक्षराज


## थोडक्यात

# पेण होमिओपॅथिक डॉक्टर असोसिएशनकडून जागतिक होमिओपॅथिक दिवस साजरा



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१९, पेण (रायगड) :** पेण होमिओपॅथिक डॉक्टर असोसिएशन कडून होमिओपॅथीचे जनक डॉ.सॅम्युअल हेनेमन यांच्या जन्मदिवसानिमित्त साजरा होणारा जागतिक होमिओपॅथिक दिवस पेण येथे साजरा करण्यात आला. यावेळेस प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दिनकर पाटील, डॉ.सचिन नाईक, डॉ.वैभव मोकल, डॉ.संजय कुरुंगळे, डॉ.तुषार गावंड, डॉ.आशीर्वाद मोकल, डॉ.किशोर देशमुख यांच्या उपस्थितीत जागतिक होमिओपॅथिक दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित डॉक्टरांच्या ज्ञानामध्ये अजून वाढ व्हावी यासाठी कॅन्सर तज्ञ डॉ.सलील पाटकर तसेच आयुर्वेद तज्ञ डॉ. राजश्री गावंड, होमिओपॅथिक तज्ञ डॉ. स्वप्नील आहेर या तिघांनी आपल्या रोजच्या दैनंदिन प्रॅक्टिस मध्ये आपण कसे डायग्नोस करू शकतो व उपचार करताना कोणत्या औषधांचा वापर केला पाहिजे. या संदर्भातील माहिती उपस्थित डॉक्टरांना देण्यात आली. यावेळी डॉ.सतीश पवार यांचा ३८ वर्ष वैद्यकीय सेवा दिल्याबद्दल असोसिएशन तर्फे गौरव करण्यात आला. याप्रसंगी जवळजवळ १६० डॉक्टर उपस्थित होते. तसेच आजच्या कार्यक्रमाचे प्रायोजक एसबीएल कंपनी नारंका फार्म यांचे प्रतिनिधी सुद्धा उपस्थित होते. आजचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पेण होमिओपॅथिक डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील, उपाध्यक्ष डॉ.मेधा पाटील, सचिव डॉ.अमित पाटील, डॉ.पुष्पेन्द्र पाटील, डॉ.आशा कदम, डॉ.विश्वनाथ पाटील, डॉ. विराज पाटील, डॉ.मंदार गावंड संघटनेचे मेंबर्स यांनी खूप मेहनत घेतली व हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. तर या कार्यक्रमासाठी डॉ.किशोर देशमुख यांनी विनामूल्य हॉल उपलब्ध करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रुचिरा पवार व डॉ.मानसी कदम यांनी केले. तसेच उपस्थित डॉक्टरांचे आभार डॉ.योगेश भोंडकर यांनी मानले.

# 'अम्मा की पढाई' गरजू विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारा उपक्रम - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** 'अम्मा की पढ़ाई' हा उपक्रम केवळ शिक्षण देण्यासाठी नसून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात नवी दिशा देण्यासाठी आहे. सुरुवातीला अनेक अडचणी आल्या, काही वेळा उपक्रम थांबण्याचीही वेळ आली. मात्र विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे योगदान आणि आमचा दृढ निश्चय यामुळे हा उपक्रम पुन्हा उभा राहिला असून आज तो शेकडो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवत आहे. 'अम्मा कि पढाई' गरजु विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशाचे पंख देणारा उपक्रम असल्याचे प्रतिपादन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

'अम्मा की पढ़ाई' शिक्षा केंद्रातील १३ विद्यार्थ्यांची पोलीस विभागात नियुक्ती झाली आहे. तर एका विद्यार्थ्याची पोलीस उपनिरीक्षक, तर दोन विद्यार्थ्यांची कर निरीक्षक म्हणून निवड झाली आहे. तसेच इतर विद्यार्थी विविध शासकीय सेवेत रुजू झाले आहेत. अशा एकूण २३ विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत, पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष रविंद्र




शिंदे, माजी कुलगुरू डॉ. विजय आईंचवार, गडचांदूरचे नगराध्यक्ष निलेश ताजने तसेच 'अम्मा की पढ़ाई' केंद्रातून शिक्षण घेऊन नुकतेच पोलीस उपनिरीक्षक म्हणून नियुक्त झालेले पुण्यदीप शिलारकर, रघुवीर अहिर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आजचा हा क्षण केवळ आनंदाचा नाही, तर अत्यंत भावनिक आहे. येथे बसलेला प्रत्येक विद्यार्थी हा संघर्ष, जिद्द आणि मेहनतीचा जिवंत पुरावा आहे. ज्यांना शिक्षणाची संधी मिळत नाही, अशा गरजू विद्यार्थ्यांचे स्वप्न कधीच अपूर्ण राहू नये, हा 'अम्मा की पढ़ाई' उपक्रम सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश होता. ते पुढे म्हणाले, दहावीत उत्तम गुण मिळवीत उत्तीर्ण होऊनही मला पुढील शिक्षण घेता आले नाही. इच्छा असूनही शिक्षण थांबवावे लागले. त्या वेदनेने मला आतून अस्वस्थ केले. आजही शिक्षण सुटल्याचे दुःख जाणवते. त्याच वेदनेतून हा संकल्प उभा राहिला.

या शिक्षण केंद्रात तज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन, नियमित चाचण्या, मुलाखतीची तयारी तसेच शारीरिक चाचणीचे प्रशिक्षण अशा सर्व सुविधा निशुल्क उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आज या उपक्रमातून १३ विद्यार्थी पोलीस दलात दाखल झाले असून इतर अनेक विद्यार्थी विविध शासकीय सेवांमध्ये निवडले गेले आहेत. हे यश केवळ त्यांचे नसून त्यांच्या कुटुंबांचे, शिक्षकांचे आणि या उपक्रमावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश मिळवता येते, हे या विद्यार्थ्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

तुमचे हे यश ही केवळ सुरुवात आहे. पुढील काळात तुम्ही समाजात जबाबदारीची भूमिका पार पाडणार आहात. मिळालेलं पद हे सेवेचं साधन आहे. तुम्ही जिथून आलात, त्या मातीतल्या संघर्षाची जाणीव कायम ठेवा आणि समाजासाठी प्रामाणिकपणे काम करा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमात यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विनय गौडा जी. सी., जिल्हाधिकारी वसुमना पंत आणि पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनीही आपल्या भाषणात 'अम्मा की पढ़ाई' उपक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमाचा विद्यार्थ्यांना मोठा लाभ होत असल्याचे सांगितले. यावेळी एआयआयएमएस नागपूर मधून एमबीबीएस शिक्षणात सर्वोच्च प्रावीण्य मिळवत गोल्ड मेडल पटकावून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या वैदेही लोहिया हिचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

***जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांचा निरोप समारंभ***

यावेळी 'अम्मा की पढ़ाई' ट्रस्टच्या वतीनेजिल्हाधिकारी विनय गौडा यांचा निरोप समारंभ तसेच सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी चंद्रपूर जिल्ह्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. जनतेसाठी सहज उपलब्ध असणारे जिल्हाधिकारी अशी त्यांची ओळख असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

# अ‍ॅड.भूपेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळवाटप व वृक्षारोपण



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१९, चिमूर (चंद्रपूर) :** वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा एक वेक्तिमहत्व असलेले अ‍ॅड भूपेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आज दिनांक २० एप्रिल चिमूर येथील उपजिल्हा रुग्णालय येथे सकाळी ११ वाजता रुग्णांना फळवाटप करण्यात येणार आहे. विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे अशी माहिती वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानचे सचिव सुरेश डांगे यांनी दिली आहे.

# डहाणू-चारोटी राज्यमार्गावरील सुसेरी नदीवरील पूल मृत्यूचा सापळा

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१९, डहाणू (पालघर) :** पालघर जिल्ह्यातील डहाणू-चारोटी राज्यमार्गावरील सुसेरी नदीवरील पूल सध्या वाहनचालकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. रानशेत-वधना परिसरातील या पुलावर वारंवार अपघात घडत असून अनेक वाहने थेट नदीपात्रात कोसळल्याच्या घटना समोर आल्या आहेत. यात अनेक चालक जखमी झाले असून काही कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे.

या धोकादायक पुलाची अवस्था इतकी बिकट असतानाही संबंधित प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) मात्र पूर्णपणे निष्क्रीय असल्याचे चित्र दिसत आहे. या अपघातांची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधीही याच



मार्गाने प्रवास करत असतानाही त्यांनी या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवरही काम अर्धवट सोडल्याचा आरोप होत असून, भ्रष्टाचारामुळेच पुलाचे काम रखडल्याची चर्चा रंगत आहे.

आणखी किती जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार? असा थेट सवाल स्थानिकांकडून केला जात आहे. पुलावर सुरक्षेच्या कोणत्याही ठोस उपाययोजना नसल्याने दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तात्काळ दुरुस्ती, संरक्षक कठडे, इशार फलक आणि योग्य प्रकाशयोजना करण्याची मागणी जोर धरत आहे,अन्यथा या पुलावर होणारे अपघात थांबणे कठीण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे,सध्या तरी सुसेरी नदीवरील हा पूल विकास नव्हे तर निष्काळजीपणाचे जिवंत उदाहरण ठरत असून प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

# शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथे भुईमूग पिकाच्या आखिल भारतीय वार्षिक बैठकीचे आयोजन




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१९, राहुरी विद्यापीठ :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि भाकृअप - भारतीय भुईमूग संशोधन संस्था, जुनागढ यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथे दि. २१ ते २३ एप्रिल, २०२६ रोजी अखिल भारतीय समन्वित भुईमूग सुधार प्रकल्पाच्या वार्षिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी महाविद्यालय, पुणे येथील शिरनामे सभागृहात दि. २१ एप्रिल, २०२६ रोजी होणाऱ्या उदघाटनाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे उपस्थित असणार आहेत. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उप-महासंचालक (पीक शास्त्र) डॉ. डी. के. यादव हे उपस्थित असणार आहेत. याप्रसंगी सन्माननीय अतिथी म्हणून नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे सहाय्यक महासंचालक (तेलबीया व कडधान्ये) डॉ. संजीव गुप्ता हे उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाच्या उपाध्यक्षपदी जुनागड येथील भाकृअप- भारतीय भुईमूग संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस. के. बेरा उपस्थित राहणार आहेत.

सदर बैठकी प्रसंगी देशातील विविध १९ राज्यातून १५० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ, मान्यवर उपस्थित राहणार आहे. या तीन दिवसीय बैठकीमध्ये प्रत्येक राज्यात सुरू असलेल्या भुईमूग पिकावरील संशोधनाचे सादरीकरण होणार आहे. याप्रसंगी भुईमूग पिकाच्या संशोधनावर सखोल विचारमंथन होऊन राष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांसाठी नवीन शिफारशी आणि भुईमुगाचे प्रगत वाण प्रसारित करण्यात येणार आहेत. या बैठकीत इतर राज्यात भुईमूग पिकावर सुरू असलेल्या संशोधनाचे आदान प्रदान होणार आहे.

या बैठकीत भुईमूग पिकावरील पुढील वर्षाच्या संशोधनाची दिशा ठरणार असल्याची माहिती महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक तथा या कार्यक्रमाचे आयोजन सचिव डॉ. प्रशांत बोडके आणि जळगाव येथील तेलबिया संशोधन प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ तथा कार्यक्रमाचे सह आयोजन सचिव डॉ. दीपक दहाट यांनी दिली.

# महादुलाच्या श्रीवास नगरमध्ये भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या भीमोत्सवाची विविध कार्यक्रमांतर्गत सांगता

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** क्रांतिवीर श्याम लालबाबू श्रीवास स्मृती बहुद्देशीय संस्था महादुला व प्रबुद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने ११ एप्रिल ते १८ एप्रिल पर्यंत विविध सांस्कृतिक, सामाजिक, कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ज्यात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती, लता मंगेशकर रुग्णालय हिंगणा यांच्या तर्फे मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण, भिम गीतांचा संगीतमय प्रबोधन कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, मुलांकरिता चित्रकला स्पर्धा व विविध स्पर्धा, स्त्रीयांकरिता विविध स्पर्धा, फन गेम, अंधश्रद्धा निर्मूलन व व्यसनमुक्ती कार्यक्रम, सामूहिक बुद्ध वंदना, बुंदी वाटप, भव्य भोजनदान असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शुभहस्ते महाराष्ट्र पोलीस, केंद्रीय पोलीस बल, महानिर्मिती, बँक अश्या विविध शासकीय विभागात निवड झालेले विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.




सदर कार्यक्रमामध्ये सर्व महापुरुषांचे फलक लावून तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सुविचाराचे फलक लावून प्रचार प्रसार करून मानवंदना देण्यात आली तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आयोजित स्पर्धेच्या सर्व विजेत्यांना पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

भव्य भोजनदान आयोजित करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी अंदाजे २७०० ग्रामस्थांनी भोजनदानाचा लाभ घेतला.

भीम उत्सवात महादुल नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष हेमलता सावजी ठाकूर, माजी नगराध्यक्ष राजेश रंगारी, माजी नगराध्यक्ष कांचनताई कुथे, कोराडी वीज केंद्राचे प्रभारी मुख्य अभियंता सुदीप राणे, पोलीस निरीक्षक गणेश धुमाळ, संस्था अध्यक्ष राजेश मछले, नगरपंचायत महादुला उपाध्यक्ष व नगरसेवक /नगरसेविका वैशाली पखीड्डे, अभिजीत ढेंगरे, नंदा तूरक, गोपाल सिंग नैकाने, मोहसीन शेख, प्रितम लोहासारवा, अजय सोलंकी, राजकुमार उईके, स्वाती पटले, संध्या साबळे, स्वाती लांडे, सोनू उघडे, गंगा जैन, आम्रपाली सोनारे, पूजा मेश्राम, सचिन पाटील, पंकज ढोणे, महेश धुडस, नाना लांडे, लालू उघडे, जितु भगत, मुन्ना मेश्राम, हुकूमचंद जनबंधू, पुरण आगासे, घनश्याम मेश्राम, ब्रिजलाल खोब्रागडे, सुरेश मोटघरे, सुनील खोब्रागडे, बाळू वानखेडे, यशवंत मेश्राम आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संयोजक अमरजीत गोडबोले यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नमिता गोडबोले, शोभाताई इंगोले, निकिता लोणारे, शांताबाई खोब्रागडे, वर्षा तानोडे, आशा यादव, मंदा मोटघरे, सपना गजभिये, कमलेश खोब्रागडे, राहुल इंगोले, सुमित मेघराज, प्रवीण वानखेडे, अनिकेत वाणी, विक्की खरवडे, राजेश बोरकर, दिपक सूर्यवंशी, निरंजन वालदे, अभिजीत इंगोले, प्रितेश वानखेडे, राजकुमार नारनवरे, योगेश मेश्राम, नीतून आगासे, दीपक सूर्यवंशी, आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात खरीप हंगामासाठी युरिया खताचा मुबलक साठा...

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१९, पेण (रायगड) :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आगामी हंगामात रासायनिक खतांचा पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने व्यापक नियोजन केले आहे. शासनाकडून रायगड जिल्ह्यासाठी एकूण १४,००० मेट्रिक टन रासायनिक खताचे वाटप प्राप्त झाले असून एप्रिल २०२६ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत नियोजित साठ्यानुसार खत विक्रेत्यांना टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे.

हंगामाच्या काळात खतांची टंचाई निर्माण होऊ नये. यासाठी जिल्ह्यात १,१२० मेट्रिक टनांचा संरक्षित साठा ठेवण्यात येणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. या नियोजनामुळे जिल्ह्यात आवश्यकतेनुसार अनुदानित खते उपलब्ध राहतील आणि शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

दरम्यान, अनुदानित युरियाचा शेतीव्यतिरिक्त इतर कारणांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी कृषी विभागाने तपासणी मोहीम हाती घेतली आहे. औद्योगिक वापरासाठी युरिया वापरणाऱ्या कंपन्यांची विशेष तपासणी करण्यात येत असून आतापर्यंत १२ कंपन्यांची पाहणी करण्यात आली आहे. संबंधित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

ही तपासणी मोहीम पुढेही नियमितपणे सुरू राहणार असून, अनधिकृत साठा किंवा गैरवापर आढळल्यास संबंधित कंपन्यांवर रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.



अनुदानित युरियाच्या गैरवापरावर कृषि विभागाची कडक नजर

जिल्ह्यात उपलब्ध असलेले मंजूर वाटप आणि साठा लक्षात घेता खतांची टंचाई निर्माण होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाईघाईने खत खरेदी करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच कुठेही खत विक्रीत 'लिंकिंग' करून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्यास तात्काळ संबंधित तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रायगड यांनी केले आहे.

# 'आपले सरकार' वरील तक्रारीला यश!

## भारत गिअर्स फ्लायओव्हरच्या धोकादायक रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, शिळफाटा (ठाणे) :** नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या भारत गिअर्स फ्लायओव्हरच्या १०० मीटरच्या धोकादायक रस्त्याच्या दुरुस्तीला अखेर आज सुरुवात झाली आहे. मुंब्रा-शिळफाटा मार्गावरील या पुलाच्या रस्त्याचा पृष्ठभाग पूर्णपणे उखडल्याने दररोज अपघातांना निमंत्रण मिळत होते. याबाबत शिळ येथील जागरूक नागरिक जयेश दाटीलकर यांनी १० मार्च २०२६ रोजी 'आपले सरकार' पोर्टलवर तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत सार्वजनिक बांधकाम विभागाने (PWD) आज शनिवारी दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली.

**तक्रारीत मांडली होती गंभीर परिस्थिती :**

टोकन क्र. TAL/PWOD/THAN/2026/12 अन्वये दाखल केलेल्या तक्रारीत जयेश दातिलकर यांनी नमूद केले होते की, भारत गिअर्स फ्लायओव्हरवर सुमारे १०० मीटरच्या पट्ट्यात डांबर/बिट्युमेनचा पृष्ठभाग पूर्णपणे नष्ट झाला असून, काँक्रीट व लोखंडी सांधे उघडे पडले आहेत. जड वाहनांच्या सततच्या रहदारीमुळे पुलाला कंपन होऊन संरचनात्मक धोका निर्माण झाला आहे. दररोज शेकडो वाहनांचे टायर फुटणे, सस्पेन्शन खराब होणे व अचानक ब्रेक लावल्याने अपघात होण्याची शक्यता आहे.



GRIEVANCE REDRESSAL PORTAL
Government of Maharashtra

आपले सरकार

Dear Citizen,
Your grievance has been successfully submitted on Grievance Redressal Portal (https://grievances.maharashtra.gov.in/)

| # | Category | Details |
|---|---|---|
| 1 | Grievance Token No | TAL/PWOD/THAN/2026/12 |
| 2 | Submission Date & Time | 2026-03-10 04:05:39 |
| 3 | Status | Submitted |
| 4 | Name | Jayesh |
| 5 | Mobile No | 7977725292 |
| 6 | Email Id | jay.datilkar@gmail.com |
| 7 | District & Taluka & Village \| Department Name \| Office | Thane & Thane & Sheel \| Public Works \| Executive Engineer(Road),Thane Office |
| 8 | Nature of Grievance | Roads and bridges- Repairs, maintenance and collection of tolls |

| # | Category | Details |
|---|---|---|
| 9 | Grievance | To, **The Executive Engineer,** Public Works Department (PWD), Thane Division, Thane - 400601. **Date:** March 10, 2026 **Subject: Urgent complaint regarding the missing road surface on a 100-meter patch of the Bharat Gears Flyover.** **Respected Sir/Madam,** I am writing this letter to bring to your immediate attention the deplorable condition of the **Bharat Gears Flyover (Mumbra-Shilphata Road)**. Specifically, there is a stretch of approximately **100 meters** on the bridge where the asphalt/bitumen surface has completely eroded, leaving the structural concrete or metal joints exposed. This missing road patch is causing the following serious issues: Structural Damage: The constant impact of heavy vehicles directly on the unfinished surface is causing severe vibrations, which may lead to long-term structural damage and weaken the integrity of the bridge. Vehicle Damage: Hundreds of commuters are facing mechanical failures, tyre bursts, and suspension damage daily due to this uneven 100-meter stretch. Accident Hazard: Sudden braking by drivers to avoid the rough patch is leading to near-miss situations and minor collisions, especially during peak hours. Despite this bridge being a vital link for heavy commercial traffic, the maintenance of this particular 100-meter segment has been neglected. I earnestly request your department to: 1. Conduct an immediate site inspection of the Bharat Gears Flyover. 2. Carry out urgent resurfacing (asphalting) of the 100-meter damaged patch. We hope the PWD acts swiftly before a major structural failure or a fatal accident occurs. I have attached photographs of the damaged section for your reference. Thanking you, Yours faithfully, Jayesh |
| 10 | Files Shared | |

In case of any queries, kindly contact1800 120 8040

**तातडीने पाहणी व डांबरीकरणाची मागणी :**

हा पूल जड वाहतुकीसाठी महत्त्वाचा असूनही या १०० मीटरच्या भागाकडे दुर्लक्ष झाले आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी PWD ने तातडीने साइट इन्स्पेक्शन करून अर्जंट रिसर्फेसिंग करावे, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली होती.

**जयेश दातिलकर यांच्या पाठपुराव्याला यश, नागरिकांत समाधान :**

सततच्या पाठपुराव्यानंतर झथू ठाणे विभाग, कार्यकारी अभियंता (रस्ते) यांनी दखल घेत आज १८ एप्रिल रोजी दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली. यामुळे दररोज ये-जा करणाऱ्या हजारो वाहनचालकांनी व स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**'आपले सरकार' पोर्टल ठरले प्रभावी :**

योग्य व्यासपीठावर योग्य पद्धतीने तक्रार केल्यास प्रशासन काम करतेच. हा विजय सर्वसामान्य नागरिकांच्या जागरूकतेचा आहे. भारत गियर ते शिळफाटा हा पट्टा अत्यंत वर्दळीचा आहे. आता अपघातांचा धोका टळेल, अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

'आपले सरकार' पोर्टलच्या माध्यमातून सामान्य नागरिकही प्रशासनाला जागे करू शकतात आणि प्रश्न सोडवू शकतात, याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे.

# डोंबिवलीत ज्येष्ठांसाठी 'आरोग्यकेंद्रित' सामुदायिक सभागृहाचे उद्घाटन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१८, डोंबिवली (ठाणे) :** वय वाढले तरी उत्साह कमी होऊ नये या भावनेतून रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट आणि स्वामी समर्थ मंदिर, रामनगर यांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी समर्पित 'आरोग्यकेंद्रित सामुदायिक सभागृहा'चे उद्घाटन शनिवारी थाटात संपन्न झाले.

**डोंबिवलीतील पहिला उपक्रम :**

रोटरी विश्वनाथ मेमोरियल हेल्थ फाउंडेशनच्या तिसऱ्या मजल्यावर उभारलेले हे सभागृह डोंबिवलीतील आपल्या प्रकारचे पहिले आरोग्यकेंद्रित सामुदायिक सभागृह ठरले आहे. दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी हे सभागृह ज्येष्ठ नागरिकांसाठी पूर्णपणे खुले राहणार असून, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.

**टिळक यांच्या हस्ते उद्घाटन, व्यायाम सत्राने सुरुवात :**

सभागृहाचे उद्घाटन प्रमुख अतिथी चंद्रशेखर टिळक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. उद्घाटनानंतर डॉ. शीतल औरंगाबादकर यांनी ज्येष्ठांसाठी खास तयार केलेल्या मूलभूत व्यायामप्रकारांचे प्रात्यक्षिक सत्र घेतले. घरी बसूनही करता येतील असे सोपे व्यायाम या सत्राला उपस्थित आजी-आजोबांनी उत्स्फूर्त दाद दिली.

**Healthy Wrinkles ची साथ, दरमहा नवे उपक्रम :**

या उपक्रमात ज्येष्ठांसाठी काम करणाऱ्या Healthy Wrinkles Pvt. Ltd. संस्थेची मोलाची साथ लाभली आहे. संस्थेचे संचालक श्री. शिधये यांनी सांगितले, दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी आरोग्य तपासणी, योगा, मानसिक आरोग्य कार्यशाळा, गप्पा-गोष्टी असे विविध उपक्रम आम्ही येथे घेणार आहोत. एकटेपणा घालवून ज्येष्ठांना 'वी-कनेक्ट' करणे हा उद्देश आहे.

**'कर्तव्य भावनेतून साकारलेला उपक्रम':**

रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टचे अध्यक्ष डॉ. संदीप घरत म्हणाले, समाज घडवणाऱ्या या पिढीच्या ऋणातून उतराई होण्यासाठी हा उपक्रम आहे. फक्त औषध नव्हे, तर संवाद, सहवास आणि सक्रियता हेच ज्येष्ठांचे खरे टॉनिक आहे.



**मान्यवरांची उपस्थिती :**

यावेळी सचिव विनायक आगटे, डॉ. माधव बैतुले, नित्यानंद घाटे, स्वामी समर्थ मंदिर विश्वस्त मंडळाचे सदस्य, प्रकल्प संचालक डॉ. अनिता यादव, प्रकल्प अध्यक्ष रविकांत खरे, डॉ. महेश पाटील, सतीश अटकेकर, संजय जोशी, सिद्धार्थ लिमये यांच्यासह अनेक रोटरी सदस्य व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्येष्ठांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच या उपक्रमाचे यश असल्याची भावना यावेळी व्यक्त झाली.

# राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेच्या स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत 'एक राज्य, एक धोरण' आखण्याची परिषदेची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेच्या स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत 'एक राज्य, एक धोरण' आखण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग चे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, ग्रामविकास मंत्री यांना शनिवार, दिनांक १८ एप्रिल २०२६ ला पाठविलेल्या निवेदनात केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ५ हजार व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती मधील जिल्हा परिषद शाळेच्या स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत धोरण आखण्यात आले आहे परंतु ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती मधील जिल्हा परिषद शाळेच्या स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत धोरण आखण्यात आले नाही. स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत लोकसंख्या हा घटक धरणे ही बाब जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य वाटत नसल्याचे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग ने निवेदनात म्हटले आहे. शालेय शिक्षण विभागाने शाळेच्या सुविधांबाबत ग्राम विकास व पंचायतराज मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित केली होती. त्या अनुषंगाने ५ हजार व त्या पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती मधील जिल्हा परिषद शाळेच्या स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता ग्रामपंचायत कर्मचारी यांनी करावी असे निर्देश आहेत. परंतु ५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायती मधील जिल्हा परिषद शाळेच्या स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत शासनाने अजून पर्यंत धोरण आखलेले नाही. त्यामुळे स्वच्छता संबंधीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जिल्हा परिषद राज्यात प्राथमिक, उच्च प्राथमिक त्याचप्रमाणे माध्यमिक शाळा चालवितात. या सर्वांवर संनियंत्रण मात्र राज्य शासनाचे असते. ग्रामीण भागातील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये शासनाने शौचालय बांधकामे केली आहेत परंतु त्याची स्वच्छता याबाबत कोणताही कर्मचारी शाळा स्तरावर उपलब्ध नाही. त्यामुळे हा प्रश्न राज्यात गंभीर बनला आहे. त्याचप्रमाणे शालेय परिसर स्वच्छ करण्यासाठी सुद्धा कर्मचारी उपलब्ध नाही. स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता याबाबत मुख्याध्यापक आपले स्तरावरून नियोजन करतात. परंतु शासनस्तरावरून अथवा जिल्हा परिषद स्तरावरून नियोजन झालेले दिसून येत नाही. स्वच्छता बाबत त्रुटी आढळल्यास प्रशासनाचे वतीने मुख्याध्यापक यांचे वर कारवाई चा बडगा उगारला जातो. हे दृश्य दिसून येत आहे. त्यामुळे राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची स्वच्छता गृहाची स्वच्छता व परिसर स्वच्छता बाबत शासनाने राज्यातील सर्व ग्रामपंचायत यांना योग्य ते निर्देश देणे अत्यावश्यक झाले आहे.

# थोडक्यात

## उन्हाळ्याचा तडाखा वाढला, बाहेर पडताना काळजी घ्या : डॉ.मोहन पाटील

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, त-हाडी (धुळे) :** सध्या उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून तापमानाचा पारा चढत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांनी अत्यंत सतर्क राहणे गरजेचे असल्याचे आवाहन त-हाडी येथील सुप्रसिध्द डॉ. मोहन आर पाटील यांनी केले आहे. उन्हाच्या झळांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात, त्यामुळे घराबाहेर पडताना योग्य ती काळजी घेणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.


डॉ. पाटील यांनी सांगितले की, दुपारच्या वेळेत शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे. अत्यावश्यक काम असल्यास डोक्यावर टोपी, गॉगल, अंगावर सैल व हलक्या रंगाचे कपडे परिधान करावेत. तसेच शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी नियमित पाणी, लिंबूपाणी, ताक किंवा फळांचे रस यांचे सेवन करणे गरजेचे आहे.

उन्हामुळे चक्कर येणे, डोके दुखणे, अशक्तपणा जाणवणे, उलट्या होणे, शरीर गरम होणे अशी लक्षणे दिसू लागल्यास ती 'ऊन्ह लागणे'ची सुरुवात असू शकते. अशा वेळी घाबरून न जाता त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी आणि जवळच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे त्यांनी नमूद केले.

विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि दीर्घकालीन आजार असलेले रुग्ण यांना उन्हाचा अधिक धोका असतो. त्यामुळे या घटकांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. शेतकरी, बांधकाम मजूर, तसेच मैदानी काम करणाऱ्या व्यक्तींनी वेळोवेळी विश्रांती घ्यावी आणि पुरेसे पाणी पिणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्याबाबत जागरूक राहावे, साधे नियम पाळून उन्हाळ्याचा त्रास टाळता येऊ शकतो, असेही सुप्रसिद्ध डॉ. मोहन पाटील साई हॉस्टपीटल त-हाडी यांनी शेवटी सांगितले.

## आळंदीत महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, आळंदी :** क्रांतीसूर्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती आळंदी नगरपरिषद येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास आळंदी नगरपरिषदचे मुख्याधिकारी माधव खांडेकर, उपनगराध्यक्ष सुजाता तापकीर, माजी नगराध्यक्ष वैजयंता उमरगेकर यांच्यासह नगरसेवक सागर कुऱ्हाडे, सोमनाथ कुऱ्हाडे, संतोष रासकर, अनिकेत तापकीर, माऊली कुऱ्हाडे, तसेच ज्ञानेश्वर बन्सोडे, अक्षय खडके (सामाजिक कार्यकर्ते) व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या विचारांचे स्मरण करत समाजात समता, बंधुता आणि प्रामाणिकतेचा संदेश दिला.

महात्मा बसवेश्वर यांनी १२व्या शतकात जातिभेद, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवून समाजसुधारणेची चळवळ उभी केली. त्यांनी कायकवे कैलास हा विचार मांडत प्रामाणिक श्रमालाच परमेश्वर मानले, जो आजही प्रेरणादायी आहे. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी बसवेश्वरांच्या विचारांचे अनुसरण करून समाज एकत्र आणण्याचे आवाहन केले.

## विविध शस्त्रासह व १,०५,१००/- रु मुद्देमालासह ४ व्यक्तींना अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.१८, बल्लारपूर (चंद्रपूर) :** दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी पोलीस स्टेशन बल्लारपूर चे डीबी स्टाफचे टिम यांना दोन इसम हातात हत्यार घेवून किल्ला वार्ड, बल्लारपूर भागात फिरत असल्याचे मुखबीरद्वारे खात्रीशीर माहीती मिळालेवरून पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांच आदेशाने डीबी स्टाफ पेट्रोलीग करीत असतांना सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान आरोपी नामे गौरव सुनिल कुकुडकर व बालाजी उर्फ कातीक शिवा मोहुर्ले दोन्ही राहणार किल्ला वार्ड या दोन इसमास ताब्यात घेतले, त्यांचजवळ एक लोखंडी फायटर व चाकू मिळून आला ते जप्त करून त्यांना ताब्यात घेवून विचारपूस केले असता विष्णु वलसा व अनुराग मातंगी यांगा अग्निशस्त्र विकी केल्याबाबत सांगीतले त्यावरून डीबी स्टाफने विष्णू यास ताब्यात घेवून च अनुराग मातंगी यांचे राहत्या घरात जावून झडती घेतले असता त्याचे घरी देशी बनावटीचे सिंगल बेरेल ७.६५ एम.एम बोअर असलेले एक माउजर अग्नीशस्त्र किंमत ४५,०००/- रूपये व ४ जिवंत काडतूस १०,०००/- अवैधरीत्या व विनापरणा दहशत माजविन्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगून असतांना मिळून आला तरी त्यास ताब्यात घेवून अग्निशस्त्र व काडतूस, दुचाकी असे एकून १,०५,१००/- रूपयाचे मुद्देमाल दोन पंचासमक्ष पंचनामा करून जप्त करण्यात आले असून गौरव सुनिल कुकुडकर, बालाजी उर्फ कातीक शिवा मोहुर्ले दोन्ही रा. किल्ला वार्ड बल्लारपूर, विष्णू भास्कर वलसा, रेल्वे वार्ड, अनुराग आनंदराव मातंगी, य. श्रीराम वार्ड, विराज आगदारी, किल्ला वार्ड, बल्लारपूर यांवेविरुद्ध पोलीस स्टेशन बल्लारपूर येथे अप क. ४६६/२०२६ कलम ३. २५, ७, २७ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले, तरी सदर अग्नीशस्त्र कोठून आणले व उद्द्देश काय होता याबाबत अधिकचा तपास पोलीसांद्वारे करण्यात येत आहे. सदर कारवाई पोलीस अधिक्षक चंद्रपूर मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रविंद्र जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन बल्लारपूरचे पोलीस निरीक्षक बिपीन इंगळे यांचे नेतृत्वात गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि अभिषेक जंगमवार, उमेश जोगदंड, पोहवा संतोष पंडीत, सत्यवान कोटनाके, संतोश दंडेवार, प्रविण निकोडे, मोहन निषाद, पंकज शिंदे, विकास जुमनाके, सचिन अल्लेवार, पोअं लखन चव्हाण, खंडेराव माने, गुरू शिंदे, वैभव गाडगे, शरद कारूष, अनिता नायडू, यांनी केली. अशी माहिती विपीन इंगळे पोलीस निरीक्षक बल्लारपूर, जि. चंद्रपूर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.